वृत्तपत्राचे नांव :– सागर

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– रत्नागिरी

वृत्तपत्र पान क :– 6

दिनांक :–05 / 08 / 2008

# गिरजाघरात घुमणार वैदिक मंत्रनाद!

अमेरिकेतील संसद आणि प्रांतीय विधानसभेनंतर आता गिरजाघर येथेहि प्रथमच वैदिक मंत्रांचे ध्वनि ऐकायला मिळणार आहेत. अमेरिकेत सण म्हणून साजरा केला जाणाऱ्या 'थँक्स गिव्हिंग डे'निमित्त



गुरूवारी नेवदा प्रांतातील रेनप येथील एपीस्कल गिरजाघरात वैदिक मंत्रोच्चारात मानवी जीवन धन्य बनविल्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद देण्यात येणार आहेत. युरोपमध्ये मनुष्य रूपात जन्म दिल्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद .देण्याची प्रथा आहे. यावेळी आयुष्य यशस्वी बनण्याची आणि मनोकामना पूर्ण होण्याची प्रार्थना केली जाते. 'थँक्स गिव्हिंग डे'मुळे आपली स्वप्ने पूर्ण होतात असा येथील लोकांचा समज आहे. त्यामुळे मंत्रोच्चारात हा सण साजरा करतात.